# एकच अमोघ उपाय - मराठी एकजूट !!

लोकसत्ता, रविवार, २० डिसेंबर २००९

सलील कुळकर्णी

marathi.ekajoot@gmail.com

*भाषाप्रेम व राष्ट्रप्रेम या भावना परस्परविरोधी (contradictory) किंवा परस्पर-व्यतिरेकी (mutually exclusive) मुळीच नाहीत; हे नीट समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. मी माझ्या आईच्या पोटी ज्या क्षणी जन्म घेतला, त्याच क्षणी आणि त्याच घटनेमुळे, मी माझ्या आजीचा (आईच्या आईचा) नातूसुद्धा ठरलो. ही दोन्ही नाती मी एका वेळीच स्वीकारतो आणि दोन्ही नात्यांचा मला सारखाच अभिमान वाटतो. या सर्व विधानांमध्ये काही विरोधाभास आहे असे आपल्याला वाटते का? त्याचप्रमाणे मी महाराष्ट्रीय आहे आणि म्हणूनच मी भारतीय आहे व या दोन्ही निष्ठांचा मला अभिमान वाटतो, ही विधानेही सुसंगतच आहेत, हे मनाला स्पष्टपणे उमगायला हवे.*

दैनिक ‘लोकसत्ता’तील लोकमुद्रा पुरवणीत ४ ऑक्टोबरला प्रसिद्ध झालेला ‘इंग्रजी भाषेचा विजय’ आणि त्यानंतर १५ नोव्हेंबर या दिवशी प्रसिद्ध झालेला ‘हिंदी ही राष्ट्रभाषा? एक चकवा!’ हे दोन्ही लेख ‘स्वभाषाभिमान’ या एकाच सूत्रात गुंफलेले होते. दोन्ही लेखांना वाचकांचा अपेक्षेबाहेर उदंड प्रतिसाद मिळाला. वाचकांच्या काही प्रतिसादांतील निवडक वेचे २९ नोव्हेंबर दिवशी प्रसिद्ध केले. त्यावरून वाचकांच्या प्रतिक्रियेमधील उत्स्फूर्तता, स्वभाषेविषयीची तळमळ आणि सध्याच्या प्रतिकूल परिस्थितीतून मार्ग काढण्याच्या प्रयत्नात सक्रिय सहभागी होण्याची प्रामाणिक इच्छा लक्षात येते. आता आपण प्रस्तुत विषयांबद्दल वाचकांनी व्यक्त केलेल्या विविध शंका व सूचना लक्षात घेऊन सद्य परिस्थितीवर एकजुटीने काय तोडगे काढता येतील यावर चर्चा करू.

‘घटनेप्रमाणे हिंदी ही राष्ट्रभाषा नाही तर ती परिशिष्ट-८ मधील २२ भाषांपैकी एक भाषा असून कुठल्याही राज्यात हिंदीसह इतर सर्वच भाषांचे स्थान संबंधित राज्यभाषेपेक्षा गौणच असते.’ हा साक्षात्कार सर्वांनाच मुक्तानंदाचा वाटला तरीही काहींना अजूनही मनोमन स्वभाषाभिमान आणि राष्ट्रवाद यांची सांगड घालणे कठीण जात आहे. अर्थात जन्मापासून वादातीत सत्य मानलेल्या तत्त्वाला असा अचानकपणे धक्का बसून त्याचा चक्काचूर झाल्यावर मनात उडणारा गोंधळ समजण्यासारखा आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या 'Thoughts on Linguistic States' या पुस्तकात म्हणतात, ‘घटक राज्ये समतोलाची राखण्यास केंद्रीय शासनामध्ये काहीही तरतूद नसल्यामुळे, नवनिर्मित विजोड राज्यांमुळे उ. प्रदेशाखेरीज इतर राज्यांत अविश्वास आणि असंतोष निर्माण होईल. सध्याच्या केंद्रीय शासनपद्धतीमुळे भारताच्या राजकारणात उ. प्रदेश इतर राज्यांहून प्रबळ ठरेल ही भीती केवळ द. भारतीयांचीच नसून पंजाब, बंगाल व इतर राज्यांनीही व्यक्त केलेली आहे आणि ही भीती निराधार आहे असे कुणीही छातीठोकपणे सांगू शकत नाही. या भीतीचे निराकरण केले नाही आणि आता विशेष उपाययोजना केली नाही तर ही भीती राष्ट्रीय ऐक्याला घातक ठरल्याशिवाय राहणार नाही, हे सत्य कुणीही लपवून ठेवू शकत नाही.’ भारतीय राज्यघटना घडवण्यात सिंहाचा वाटा असलेल्या डॉ. आंबेडकरांनी ५५ वर्षांपूर्वी दिलेल्या या

इशाऱ्यामधून त्या थोर विद्वानाची दूरदृष्टीच दिसून येत नाही का? दुर्दैवाने स्वातंत्र्योत्तर काळात डॉ. आंबेडकरांना अभिप्रेत असलेला समतोल राखण्यात भारतातील राजकारणी पूर्णत: अयशस्वी ठरल्यामुळेच विविध भाषक राज्यांमध्ये पुरेशी परस्पर सहिष्णुता व जिव्हाळा निर्माण होऊ शकलेला नाही.

भाषाप्रेम व राष्ट्रप्रेम या भावना परस्परविरोधी (contradictory) किंवा परस्पर-व्यतिरेकी (mutually exclusive) मुळीच नाहीत; हे नीट समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. मी माझ्या आईच्या पोटी ज्या क्षणी जन्म घेतला, त्याच क्षणी आणि त्याच घटनेमुळे, मी माझ्या आजीचा (आईच्या आईचा) नातूसुद्धा ठरलो. ही दोन्ही नाती मी एका वेळीच स्वीकारतो आणि दोन्ही नात्यांचा मला सारखाच अभिमान वाटतो. या सर्व विधानांमध्ये काही विरोधाभास आहे असे आपल्याला वाटते का? त्याचप्रमाणे मी महाराष्ट्रीय आहे आणि म्हणूनच मी भारतीय आहे व या दोन्ही निष्ठांचा मला अभिमान वाटतो, ही विधानेही सुसंगतच आहेत, हे मनाला स्पष्टपणे उमगायला हवे.

पूर्वी देवाला उद्देशून म्हणायचे श्लोक संस्कृतमध्ये म्हटले पाहिजेत अन्यथा देवाचा कोप होईल अशी समजूत होती. पण आज आपल्याला पक्के माहीत आहे की, देवाला संस्कृत, मराठी, तमिळ, इंग्रजी, झुलू अशा सर्वच भाषा सारख्या. प्रार्थनेमागील भावना प्रामाणिक असणे अधिक महत्त्वाचे आणि आपण मनातील भावना स्पष्टपणे, मोकळेपणाने आपल्या मातृभाषेतूनच व्यक्त करू शकतो, म्हणजे आपण मातृभाषेतून व्यक्त केलेल्या भावनाच देवाला अधिक नीट समजणार. तसाच हा देशप्रेमाचा प्रकार आहे. हिंदी हीच राष्ट्रभाषा, देशप्रेम केवळ हिंदीमधूनच व्यक्त करता येते, हिंदीच्या वर्चस्वाला विरोध करणारे लोक विघटनवादी व देशविरोधी, असे जे गैरसमज मनावर पक्के बसवले गेले आहेत त्यांचा फोलपणा विचारपूर्वक दूर केला की मग संपूर्ण चित्र सहजपणे स्पष्ट होते, मन हलके होते आणि शुद्ध अभिमानाने व अपराधी भावना मनाला शिवू न देता आपण आपले स्वभाषा व स्वसंस्कृतीबद्दलचे प्रेम उघडपणे व ठामपणे व्यक्त करू शकतो.

अर्थात एकीकडे हिंदी राजकारण्यांच्या हिंदी लादायच्या प्रयत्नाला विरोध करीत असतानाच परकीय इंग्रजी भाषा आपणच स्वखुशीने लादून घेऊन मातृभाषेचे खच्चीकरण करीत आहोत त्याचे काय? हल्ली आधुनिक जगात बहुभाषिकत्वाला बरेच उत्तेजन दिले जाते. मात्र त्यासाठी स्वत:च्या मातृभाषेचे महत्त्व यत्किंचितही कमी करणे अपेक्षित नसते. युरोपात इंग्रजी बोलणारे देश फारसे नाहीतच, पण त्या देशांनी जागतिकीकरणाच्या नावाखाली भारताप्रमाणे स्वत:च्या भाषेला बाजूला सारून शिक्षणव्यवस्था, न्यायदान, शासनव्यवस्था, समाजव्यवहार इत्यादींसाठी इंग्रजी भाषा स्वीकारलेली नाही; पण तरीही युरोपातील बहुतेक सर्वच देशांचे राहणीमान भारतापेक्षा खूपच वरच्या दर्जाचे आहे.

लोकशाहीत सर्व राज्यकारभार सामान्य जनतेच्या हितासाठीच चालवणे अपेक्षित असते. महाराष्ट्रात कायदे करणारी विधानसभा, लोकोपयोगी योजना राबवणारी शासनव्यवस्था, कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करणारे पोलीस दल आणि अपराध्यांना शिक्षा देणारी न्यायव्यवस्था, या सर्वांचे व्यवहार जर बहुजन समाजाला न समजणाऱ्या परकी भाषेत चालणार असले तर ते लोकशाहीच्या मूलभूत तत्वांच्या विरोधीच ठरेल. अशा परिस्थितीमुळेच मागासलेली व गरीब जनता, अल्पभूधारक शेतकरी, दलित, आदिवासी यांच्यासाठी असणाऱ्या विविध योजनांचे लाभ प्रत्यक्षात तळागाळांपर्यंतच्या लाभार्थींपर्यंत न पोहोचता इतर मध्यस्थ, अधिकारी, राजकारणी अशी मंडळीच त्यांचा अपहार करतात. कधी-कधी परभाषेत केलेले कायदे व त्यावर न्यायालयात परभाषेत होणारा किचकट काथ्याकूट न समजल्यामुळे सामान्य माणूस विनाकारण अपराधी ठरला जाऊन त्याला कारावास होतो व त्याउलट अशा व्यस्त समाजव्यवस्थेचा गैरफायदा घेऊन, सामान्यांना फसवणारे पैसेवाले व धूर्त लोक अपराध करूनही कायद्याच्या कचाट्यातून निसटतात. अशाच प्रकारची विपर्यस्त समाजव्यवस्था बदलण्यासाठीच तीनशे- साडेतीनशे वर्षांपूर्वी इंग्रजांनी स्वत:च्या देशात कायदे व दंड करून परकीय फ्रेंच भाषेचे वर्चस्व संपवले (पाहा लेख: इंग्रजी भाषेचा विजय) आणि पूर्व

पाकिस्तानातील बंगाली जनतेने पश्चिम पाकिस्तानातील उर्दू भाषकांचे भाषिक व सांस्कृतिक वर्चस्व झुगारून देऊन स्वतंत्र बांगला देशाची निर्मिती केली. म्हणूनच भारतात केंद्र सरकारी विभागांसाठी व संस्थांसाठी स्थानिक भाषेला सर्वाधिक प्राधान्य देणारे त्रिभाषा सूत्र असणे आणि राज्यशासनाचे सर्व व्यवहार चालवण्यासाठी राज्यभाषा अनिवार्य असणे, ही दोन्ही तत्त्वे भारतीय लोकशाहीसाठी अत्यंत आदर्शच आहेत. त्यांची अंमलबजावणी योग्य प्रकारे होत नसेल तर ती करण्यास जनतेने संबंधित शासकीय विभागांवर जनमताचा दबाव आणलाच पाहिजे.

आपल्या स्वभाषाभिमानाचा पाया अशा प्रकारे पक्का झाल्यावर आपण त्यावर मायबोलीच्या संवर्धनासाठी विविध कृतियोजनांचे इमले चढवण्याविषयी या व यापुढील लेखांत विचार करू. मराठीच्या पुढील विविध समस्यांची खालीलप्रमाणे ढोबळ वर्गवारी करता येईल.

**१. समाजात अनौपचारिक क्षेत्रांत मराठी:** स्वभाषा म्हणजे माणसाला स्वसंस्कृतीशी जोडणारी नाळच. त्यामुळे मातृभाषेपासून दूर जाणे म्हणजे स्वसंस्कृतीपासून दूर जाणे, आपल्या अस्मितेपासून दूर जाणे. एखाद्या समाजाची संस्कृती व परंपरा यांची जोपासना व संवर्धन त्या समाजाच्या मातृभाषेतूनच होऊ शकते. स्वभाषेला तिचे योग्य स्थान मिळवून देण्यासाठी आपणापैकी प्रत्येकाने प्रथम स्वत:पासूनच सुरुवात केली पाहिजे व मग या भावनेचा प्रसार आपल्या सर्व कुटुंबीयांत- मित्रमंडळींत- सहकाऱ्यांत- समाजात करायला हवा. मराठी माणसाने स्वभाषेबद्दलचा न्यूनगंड सोडून स्वराज्यात शक्यतो सर्व ठिकाणी कटाक्षाने मायबोलीत बोलणे, लिहिणे केले पाहिजे. अगदी रस्त्यावर, भाजीवाल्याकडे, वाण्याकडे, तसेच दुकाने, मॉल, हॉटेल, टपाल कार्यालय, बँका, एटीएम, रेल्वे, बस, टॅक्सी, रिक्षा अशा व इतर सार्वजनिक ठिकाणी, सरकारी कार्यालयात व जनसंपर्काशी संबंध असलेल्या सर्व खासगी आस्थापनांत, बोलताना व लिहिताना आपण निक्षून मराठीचाच वापर केला पाहिजे. आपण बहुसंख्येने तसे केले तर काही महिन्यांतच फरक दिसू लागेल. आपण इतरांना आपली भाषा ऐकवलीच नाही आणि तिची आवश्यकता निर्माण केली नाही तर ते ती शिकणार तरी का व कशी? इतर राज्यांत परप्रांतीय लोक अशाच प्रकारे स्थानिक भाषा झटपट शिकतात; कारण त्यांना ती शिकावीच लागते.

**२. औपचारिक- अधिकृत क्षेत्रांत मराठी:** वरील मुद्द्यांचीच पुढली पायरी म्हणजे मराठी भाषा राज्यात सार्वजनिक स्तरावर माहिती (information), संज्ञापन (communication) आणि सेवा (service) यांच्यासाठी सर्वत्र प्राधान्याने दृश्य, श्राव्य आणि इतर माध्यमांतून अनुभवास यायला पाहिजे. मराठी ही केवळ अशिक्षित लोकांची बोलीभाषा अशी झालेली इतरांचीच नव्हे तर आपलीसुद्धा मानसिकता बदलण्यासाठी ती समाजाच्या सर्वच स्तरांत अगत्याने व आदराने वापरली गेली पाहिजे. थोडक्यात सांगायचे तर केंद्र व राज्य शासनाचे आणि नगरपालिकांचे सर्व विभाग आणि उपक्रम, न्यायालये, रेल्वे, टपाल खाते, टेलिफोन खाते, बँका, एटीएम, रेडियो, दूरदर्शन वाहिन्या, कॉल सेंटर्स, मोबाईल कंपन्या, मॉल, दुकाने, सोसायट्या, तसेच सरकारी व खासगी आस्थापनांचे सामान्य जनतेशी संबंध येणारे सर्व व्यवहार, त्यांची संस्थळे, फॉर्म, पाट्या, घोषणा, जाहिराती अशा सर्व बाबतीत जनतेशी संपर्क-संवाद साधण्यासाठी, माहिती-सेवा देण्यासाठी मराठी भाषा सर्वाधिक प्राधान्याने वापरली गेलीच पाहिजे. अर्थात इंग्रजी शब्द जसेच्या तसे देवनागरीत लिहिणे किंवा मराठीमधील योग्य शब्द, संज्ञा, वाक्यरचना टाळून त्याऐवजी हिंदी वा इंग्रजीचा वापर करून तशीच धेडगुजरी भाषा मराठी म्हणून आमच्या माथी मारणे, हेदेखील आम्ही खपवून घेणार नाही. हिंदी, इंग्रजी किंवा इतर कुठल्याही भाषेचा द्वेष करण्याचा आपला हेतू नाही. मात्र कुठल्याही परभाषेचे अवास्तव स्तोम माजवून आपल्या मायबोलीला तिची बटीक बनवणे या हीन वृत्तीचा मात्र आपण प्रखर प्रतिकार करायलाच हवा.

संपूर्ण जगात भाषकसंख्येनुसार मराठी ही पंधराव्या क्रमांकाची भाषा आहे आणि भारतात हिंदी, बंगाली व तेलुगू भाषांच्या नंतर चौथ्या क्रमांकाची भाषा आहे. महाराष्ट्रात सुमारे दहा कोटी मराठी भाषिक आहेत. ही लोकसंख्या जगातील जर्मनी, फ्रान्स, इंग्लंड, इटली, ऑस्ट्रेलिया, स्वित्झलड, कॅनडा, स्वीडन, अशा अनेक प्रगत राष्ट्रांपेक्षादेखील कितीतरी जास्त आहे. ग्राहक म्हणूनही मराठी जनतेचे संख्याबळ फार मोठे आहे. आपल्याला आपल्या भाषेत योग्य व सक्षम पद्धतीने सेवा मिळणे हा आपला अधिकार आहे. आपण मराठी ग्राहक एकजूट बांधू शकलो तर आपले रास्त विचार आपण विविध खासगी व्यापारी कंपन्या व सरकारी संस्था यांच्या गळी नक्कीच उतरवू शकू. बहुसंख्य मराठीजनांनी आपल्या भाषेची आणि भाषकांची प्रगती साधण्यासाठी एकजूट केली तर आपल्याला काय शक्य नाही?

**३. अर्थार्जनासाठी मराठी:** ही चळवळ केवळ भावनिक पातळीवर राहूनही उपयोगी नाही. मराठीला खऱ्या अर्थाने समृद्ध, संपन्न बनवायचे असेल तर ती केवळ साहित्य-वाङ्मयाचीच भाषा न राहता आर्थिक- ऐहिक- सांसारिक समृद्धी साधण्यास साहाय्यकारक ठरणारी भाषासुद्धा व्हायला पाहिजे. त्यासाठी मराठी भाषा ही उत्पन्नाशी, रोजगाराशी, नोकरी-धंदे-व्यवहार- उद्योगाशी जोडली गेलेली भाषा सिद्ध व्हावयास हवी. मराठी भाषेचा संवादभाषा, शिक्षणभाषा, ज्ञानभाषा, माहितीभाषा अशा विविध दृष्टिकोनांतून सतत विकास साधला गेला पाहिजे. मराठीचे ज्ञान हे महाराष्ट्रात सर्वांना व्यावहारिक दृष्ट्यासुद्धा फायद्याचे, सोयीचे व प्राधान्य देणारे वाटले पाहिजे. यासाठी आय. टी. आय., एम. के. सी. एल. यांसारख्या विविध संस्थांचे कार्यक्षेत्र बरेच व्यापक व्हावे लागेल. आपल्याला खासगी उद्योगधंदे, राज्यशासन व विरोधी पक्ष अशा सर्वांवरच एकजुटीने जनमताचा दबाव आणून कामे करून घ्यावी लागतील.

**४. माहिती-तंत्रज्ञानासाठी मराठी:** संगणक आणि महाजाल ही आज ज्ञान, माहिती, शिक्षण व संज्ञापनाची अत्यंत महत्वाची माध्यमे झाली आहेत. त्यांचा मराठी भाषेतून वापर सोपा व सोयीस्कर करण्यासाठी आणि अशा त्याच्या प्रशिक्षणासाठी व सार्वत्रिक प्रसारासाठी प्रयत्न होणे अगत्याचे आहे. आपण स्वत: यासाठी बरेच करण्यासारखे आहे व शासन, खासगी उद्योग क्षेत्र आणि विविध संस्था यांच्याकडूनही बरेच करवून घेण्यासारखे आहे. महाराष्ट्रातील संगणक उपयोजकांनी एकजुटीने मनात आणले तर शासनच काय मायक्रोसॉफ्ट, गुगल व नोकियासारख्या जगातील अग्रगण्य कंपन्यासुद्धा आपल्या इच्छेचा मान राखतील, असा जगभरातील अनुभव सांगतो. अशा विविध बहुराष्ट्रीय कंपन्या ज्या भाषांत विशेष सेवा देतात त्यांची यादी पाहा. त्यापैकी बहुतेकांची लोकसंख्या महाराष्ट्राहून कमी असून काहींची तर मुंबई शहरापेक्षाही कमी आहे. त्यांच्या मानाने महाराष्ट्र हा एक प्रचंड अजस्र प्राणी आहे. आपण त्याला हलवून जागा करायला पाहिजे.

**५. आधुनिक साहित्य-संस्कृती-ज्ञान-विज्ञानाचे माध्यम मराठी :** कुठल्याही भाषेची व तिच्या भाषकांची प्रगती ही त्या भाषेमधील साहित्याप्रमाणेच त्या भाषेतील अखंडपणे वाढणाऱ्या ज्ञानावर व असे नवनवीन ज्ञान पेलण्यासाठी सतत सक्षम होत राहणाऱ्या भाषासामर्थ्यावरही अवलंबून असते. इतर भाषांतील उत्तमोत्तम साहित्य, कोश, पाठ्यपुस्तके तसेच ज्ञान-विज्ञान-संशोधन मराठी भाषेत आणणे आणि त्याचबरोबर असे ज्ञान लीलया पेलण्यासाठी तिला उच्च दर्जाच्या साहित्याची, उच्च शिक्षणाची, ज्ञानाची व संशोधनाची भाषा बनविणे या दृष्टीने सतत प्रयत्न केले पाहिजेत. यासाठी पुन्हा शासनाला आणि विविध शासकीय व सामाजिक संस्थांना अशा प्रयत्नांचे महत्त्व पटवून देऊन योग्य प्रकल्प कार्यान्वित व्हायला हवेत.

**६. शिक्षणासाठी मराठी :** एक अतिशय महत्त्वाची आणि मूलभूत बाब म्हणजे शिक्षणात असलेले मातृभाषेचे स्थान. भारतातील इतर राज्यांप्रमाणे महाराष्ट्रातही स्थानिक भाषेचे शिक्षण सर्वच शाळांमध्ये निदान पाचवी ते दहावीपर्यंत अनिवार्य असायलाच हवे. यासाठी स्वत: सर्वोच्च न्यायालयानेही राज्यशासनास कायदेशीर व नैतिक तत्वांवर पाठिंबा दिलेला आहे. बहुसंख्यांपर्यंत ज्ञान पोहोचवण्यासाठी ते त्यांना सहज समजेल अशा

स्थानिक भाषेतूनच पोचवायला पाहिजे. अर्थात त्यासाठी इंग्रजी शिकणे/शिकवणे बंद करण्याचे कारणच नाही. उलट इंग्रजी भाषेवरसुद्धा प्रभुत्वच मिळवायला पाहिजे. पण कुठलीही परभाषा मातृभाषेची जागा घेऊ शकत नाही. आजकाल शासनाचे शिक्षणासंबंधीचे निर्णय अत्यंत ऱ्हस्व दृष्टीचे, धरसोड वृत्तीचे तसंच 'दाखवायचे दात वेगळे आणि खायचे वेगळे' अशा प्रकारचे असतात. इतर राज्यांप्रमाणे महाराष्ट्रातील शाळांत मराठी विषयाचे शिक्षण अनिवार्य करण्यास चालढकल करणाऱ्या, गेल्या एका वर्षात महाराष्ट्रात मराठी शाळा सुरू करण्यासाठी आलेले शेकडो (१७००?) अर्ज केराच्या टोपलीत फेकून देऊन, जवळजवळ ४००० इंग्रजी शाळांना मात्र तत्परतेने अनुमती देणाऱ्या व मराठी शाळांचे गेल्या ४-५ वर्षांतील अनुदान रोखून ठेवून योजनाबद्ध पद्धतीने गळा घोटू पाहणाऱ्या राज्य शासनाला मराठीतील शिक्षणाला लवकरात लवकर तिलांजली द्यायची आहे, असा निष्कर्ष कोणी काढला तर ते चुकीचे ठरेल का? आज शिक्षणमंत्र्यांसकट बहुतेक सर्वच पक्षांच्या राजकारण्यांनी व इतर श्रीमंत उद्योगपतींनी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे इंग्रजी शाळा व महाविद्यालये उघडून शिक्षणाच्या बाजारात आपली दुकाने टाकल्यानंतर स्वतःच्या धंद्याला गिऱ्हाईके वाढवण्यासाठी ही सर्व मंडळी पद्धतशीरपणे मराठी शिक्षणाचे खच्चीकरण करायला निघाली आहेत. हे समजायला कोणाही तज्ज्ञांची आवश्यकता नाही. अशा या धंदेवाईक राजकारण्यांना घटनेने नेमून दिलेल्या तसेच महात्मा गांधींनी व अनेक तज्ज्ञ समित्यांनी (त्यातील सर्वात शेवटचे उत्तम उदाहरण म्हणजे प्रा. राम जोशी समिती) पुनःपुन्हा अधोरेखित केलेल्या शासनाच्या स्वभाषेप्रती व स्वसंस्कृतिप्रती असणाऱ्या विविध कर्तव्यांची आठवण करून देऊन त्याप्रमाणे त्यांना वागावयास भाग पाडणे हे आपणासमोर मोठे आव्हान आहे. प्रथम शाळांत व नंतर टप्प्या-टप्प्याने उच्च शिक्षणात मराठीचा वापर वाढवीत नेला पाहिजे. आपल्यापुढे अनेक आव्हाने आहेत. माहिती अधिकार हे कायद्याने जनतेच्या हवाली केलेले एक अत्यंत प्रभावी अस्त्र आहे. त्याचीही नीट माहिती करून घेऊन उपयोग करू. आपण जर मोठ्या संख्येने एकत्र आलो, एका वेळी मोजक्या उद्दिष्टांवर एकाग्रतेने (focussed) व योग्य व्यूहनीती योजून काम केले तर आपण नक्कीच बरेच काही साधू शकू. अर्थात हे सर्व करताना आपण एक महत्त्वाचा मुद्दा नेहमी लक्षात ठेवला पाहिजे. तो असा की, आपल्याला सध्याच्या समाजव्यवस्थेत योग्य सुधारणा घडवून आणायच्या आहेत. समाजव्यवस्था मोडायची नाही.

हिंदी राष्ट्रभाषेबद्दलच्या लेखानंतर अनेक मंडळींनी उत्स्फूर्तपणे प्रतिक्रिया पाठवल्या. त्यात नुकतीच विशी ओलांडलेल्या उष्ण रक्ताच्या तरुण-तरुणींपासून ते ऐंशीचा उंबरठा ओलांडलेल्या अनुभवी, विचारपरिपक्व आणि अजूनही उरी जिद्द व उमेद बाळगणाऱ्या स्त्री-पुरुषांपर्यंत अनेक मराठीप्रेमींनी सूचना केल्या आहेत. मराठी जनतेने एकत्र येऊन एकजुटीने चळवळ सुरू केली पाहिजे यावर बहुसंख्यांचे एकमत दिसते. अनेकांनी तर आणखी पुढे जाऊन स्वतः अशा प्रकारच्या चळवळीत नक्कीच सहभागी होऊ अशी खात्री दिली आहे. अशी इच्छा व्यक्त करणाऱ्यांत महाराष्ट्रातील व गोव्यातीलच नव्हे तर परदेशातील देखील प्राध्यापक, शिक्षक, पत्रकार, लेखक, डॉक्टर, वकील, अभियंते, चार्टर्ड अकाऊंटंट, कलावंत, तसेच गृहिणी (हा अत्यंत महत्त्वाचा पेशा आहे), उद्योगपती, दुकानदार, विद्यार्थी, व्यावसायिक, नोकरपेशातील किंवा सेवानिवृत्त व्यक्ती व इतर क्षेत्रांतील व्यक्तींचा समावेश आहे. प्रा. रमेशचंद्र पानसे (ग्राममंगल संस्था), प्रा. दीपक पवार (मराठी अभ्यास केंद्र), विवेक वेलणकर (पुणे नागरिक मंच), प्रा. अनिल गोरे (समर्थ मराठी संस्था), कौशल इनामदार (मराठी अस्मिता), श्रीकांत लेले (मराठी भाषा संरक्षण व विकास संस्था), विकास पिसाळ (माय-मराठी संस्था), अशा काही सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रांत मराठीसाठी काम करणाऱ्या संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी सहकार्य करण्याचे मान्य केलेले आहे. आणखीही काही संस्थांशी चर्चा चालू आहे.

या एकजुटीच्या चळवळीत सहभागी होण्यास एक मूलभूत पण अत्यंत महत्त्वाची अट म्हणजे मराठी भाषेवर व संस्कृतीवर निस्सीम प्रेम असणे आणि मराठी भाषा व भाषकांच्या हितासाठी एकत्रितपणे

प्रामाणिक प्रयत्न करण्यासाठी यथाशक्ती थोडाफार वेळ, बुद्धी आणि श्रम खर्च करण्याची तयारी असणे. अगदी आठवड्याला सरासरी एखादा तास वेळ काढणे शक्य असले तरी हरकत नाही. वृद्धांनी मार्गदर्शन करावे. इतर कुठलेही निकष लागू नाहीत. धर्म-जात-पंथ किंवा अशा इतर कुठल्याही निकषावर आपण आपापसात भेद करायचे नाही. वैयक्तिक पातळीवर असणाऱ्या एकमेकांच्या राजकीय आवडी-निवडीबद्दलही आपले काही म्हणणे नसावे. कुठल्याही राजकीय पक्षातील मंडळींना आपल्या चळवळीला प्रामाणिकपणे मदत करायची असल्यास आपण त्यांचे स्वागतच करू. जो मराठीचा पाठीराखा तो आपला मित्र. जो मराठीचा द्वेष्टा तो आपला हितशत्रू. शिवाय कुठल्याही मराठी-प्रेमी व्यक्तीच्या बाबतीत 'आपण स्वत:, आपली मुले किंवा आपली नातवंडे इंग्रजी माध्यमात शिकतात काय? तसे असल्यास तुम्हाला मराठीच्या प्रेमाचा अधिकारच नाही. अशा प्रकारचा वजाबाकीचे गणित करणारा दृष्टिकोन आपण ठेवायचा नाही. बऱ्याचदा इच्छा असूनही विविध कारणास्तव मुलास मराठी शाळेत घालणे शक्य होत नाही. त्याला मुख्यत: सध्याची सामाजिक परिस्थिती व आपण निवडून दिलेले राजकारणी हेच कारणीभूत आहेत. त्यासाठी कोणा एकाला व्यक्तिश: जबाबदार धरता येणार नाही. भाषेमुळे मान, धन व ज्ञान मिळू लागले तर या परिस्थितीत निश्चितच फरक होईल. हे सर्व बदल ओघाने, टप्प्या-टप्प्यानेच होतील; पण त्यासाठी योग्य ती वातावरणनिर्मिती प्रथम घडवून आणली पाहिजे. मात्र आपापसात वाद निर्माण करून एकजुटीत फूट पाडायची नाही. आपले विरोधक अत्यंत बलवान असल्यामुळे आपली सर्व शक्ती त्यांच्याशी लढण्यासाठी आपल्याला साठवून ठेवायला हवी.

विविध उद्देशांसाठी 'मराठी एकजूट' साधण्याच्या दृष्टीने आपण एकत्र येऊन औपचारिकपणे एखादा संघ स्थापन करणे, एकमेकांच्या सतत संपर्कात राहणे व वेळोवेळी एकत्रितपणे कृती करणे फार महत्त्वाचे आहे. यादृष्टीने मायबोली मराठीसाठी प्रामाणिकपणे कृती करू इच्छिणाऱ्या सर्व सज्ञान (मत देण्यायोग्य वयाच्या) मराठीप्रेमींना मी 'मराठी एकजुटी'मध्ये सहभागी होण्याचे कळकळीचे आवाहन करतो. त्यासाठी आपले नाव, जन्मदिनांक, संपर्कासाठी वास्तव्याचा संपूर्ण पत्ता, शक्यतो ई-मेल, पत्ता, चलध्वनी आणि दूरध्वनी क्रमांक, शिक्षण, व्यवसाय आणि मराठीच्या हितासाठी करण्यासारख्या विविध लहान-मोठ्या कृतीसंबंधी आपल्या सूचना, असे सर्व तपशील शक्यतो ई-मेलने **marathi.ekajoot@gmail.com** या ई-पत्त्यावर किंवा पत्राने 'मराठी एकजूट', टपाल-पेटी क्रमांक १९२०, पुणे-४११ ०३८, या पत्त्यावर कळवावेत. आजच्या आधुनिक काळात ई-मेलद्वारे संपर्कात राहणे हे झटपट, बिनखर्चाचे व अत्यंत सोयीचे ठरते. त्यामुळे शक्य असेल तर इतर तपशिलाबरोबरच आपला ई-मेल पत्तासुद्धा नक्की कळवा. आपल्याकडे महाराष्ट्र व मराठी यांच्या संबंधातील चांगल्या कविता, लेख, माहिती व भाषणे किंवा काही विशेष अनुभव गाठीला असतील तर तेसुद्धा लिखित स्वरूपात अवश्य पाठवावेत.

असे हे मायबोलीच्या हितासाठी सुरू करायचे काम 'घरचे कार्य' समजून त्याची माहिती आपल्या कुटुंबीयांमधील, गोतावळ्यामधील जास्तीत जास्त, नातलग-सहकारी-मित्रांना देऊन त्यांना त्यात नाव-नोंदणी करून सहभागी होण्यास उद्युक्त करावे. राज्यातील, देशातील व परदेशांतील मराठीप्रेमी यात सहभागी होऊ शकतात. संख्याबळ, प्रामाणिक इच्छाशक्ती व योग्य व्यूहनीती व हीच आपले बलस्थाने असतील. आधीच एखाद्या संस्थेचे सभासद असलेल्या व्यक्तीने त्याव्यतिरिक्त मराठी एकजुटीत सहभागी होण्यास काहीच हरकत नाही. विविध महानगरांत, उपनगरांत, नगरांत, जिल्ह्याच्या-तालुक्याच्या-गावाच्या ठिकाणी 'मराठी-एकजुटी'चे संघ स्थापन करून एकत्रितपणे विशिष्ट मुद्द्यांवर एकाग्रपणे लढा उभारू. काही मित्रांनी अगोदरच मराठीच्या हितासाठी संस्था स्थापन केलेल्या असतील तर आपण एकमेकांच्या सहकारी संस्था म्हणून समान उद्दिष्टांच्या बाबतीत समन्वयाने व सहकार्याने कामे करू शकतो. अशा संस्थांनीसुद्धा संस्थेचे नाव, स्थापना-दिनांक, नोंदणी-क्रमांक (असल्यास), पत्ता, सर्व दूरध्वनी/चलध्वनी क्रमांक, ई-मेल पत्ता, सदस्यसंख्या, तसेच संस्थेची उद्दिष्टे व कार्ये याबद्दल थोडक्यात माहिती पाठवली तर आपल्याला एकत्रितपणे

विचारविनियम, समन्वय व कृतियोजना करणे सोपे जाईल. सतत संपर्क आणि संवाद या एकजुटीसाठी मूलभूत गरजा आहेत.

सर्वांनी मिळून आपल्या मायबोलीला तिचे गतवैभव मिळवून देण्याची प्रतिज्ञा करताना कविवर्य माधव जुलियनांच्या पुढील ओळी लक्षात ठेवायला हव्यात:

*मराठी असे आमुची मायबोली जरी पारतंत्र्यात ही खंगली।*

*हिची थोर संपत्ती गेली उपेक्षेमुळे खोल कालार्णवाच्या तळी।*

*तरी सिंधू मंथूनि काढूनि रत्ने, नियोजू तयांना हिच्या मंडनी।*

*नको रीण देवोत देतील तेव्हा जगातील भाषा हिला खंडणी।।*

**सूचना:** प्रस्तुत लेख अमृतमंथन या अनुदिनीवर वाचण्यासाठी उपलब्ध आहे.

**०-०=0=०-०**